# सॅरा हैल

समाजात आता स्त्रियांना थोडंफार महत्व आणि स्वातंत्र्य मिळू लागलं आहे. पण एक काळ असा होता जेव्हा स्त्री पायीची वहाण समजली जात असे. ही अगदी पुराणकाळातील वा ऐतिहासिक म्हणावी इतकी जुनी घटना नाही. फक्त भारतातच असं होतं, असंही नाही. सगळीकडेच स्त्रिला 'वीकर सेक्स' म्हणण्याची पद्धत होती. तिला आचार आणि विचारांचं स्वातंत्र्य नव्हतंच. शिक्षण मिळवून स्वतःचा विकास करून घेण्याची संधी वा अधिकार नव्हता. अन्याय आणि जुलमांना सामोरं जाणं, हेच तिचं प्राक्तन होतं. विसावं शतक सुरू झाल्यावरही बहुतेक देशात स्त्रिया आणि गुलामांच्या स्थितीत फरक नव्हता. गुलामीची प्रथा नष्ट झाली तरी स्त्रियांच्या परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. कारण स्त्रिया वैधानिकरीत्या गुलाम नव्हत्या. म्हणून त्यांच्या स्थितीत फरक पडण्याचा प्रश्न निर्माण झालाच नव्हता. त्यासाठी त्यांनीच काही करणं गरजेचं होतं. ते काम अत्यंत अवघड, धीराची कसोटी घेणारं आणि त्यात स्त्रीला अपयशी ठरवणारं - नापास करणारं काहीसं अशक्यप्राय काम होतं.

स्त्री विश्वात तेव्हा अज्ञान आणि अन्यायाचा निखळ अंधार होता. अशिया आणि आफ्रिका खंडात पुरोगामी विचारांचा दुष्काळ नजरेत भरण्याजोगा स्पष्ट होताच, पण सुधारक आणि पुरोगामी ठरणाऱ्या अमेरिकेतही स्त्रियांच्या बाबतीत प्रतिगामी विचारधाराच होती. पुरुषप्रधान समाज स्त्रीस्वातंत्र्य आणि समानतेचा क्रूरपणे विरोध करत होता. स्त्री मुक्तीच्या संदर्भात आघाडीवर असण्याचा दावा करणाऱ्या आजच्या अमेरिकेत शतकापूर्वी स्त्रियांची काय अवस्था होती? स्त्रीला कशा प्रकारच्या मानसिक अत्याचाराचा सामना करावा लागत होता, वगैरे प्रश्नांची उत्तरं, सॅरा हैल ह्या कर्तृत्ववान स्त्रीच्या आयुष्याचा आलेख बघितल्यास आपसूक प्राप्त होतात.

आज आघाडीच्या सामयिकात खूप स्त्रिया काम करताना दिसतात. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्या आत्मविश्वासानं वावरत आहेत. पण हे काम प्रथम सुरू कुणी केलं? ते करण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या स्त्रीला कशा प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागला? कोणत्या प्रश्नांना सामोरं जावं लागलं? वगैरे प्रश्न मनात कुतूहल निर्माण करतात! जिनं मूलभूत अधिकार मिळवण्यासाठी असीम संघर्ष पेलून, अधिकार मिळेतो न थांबण्याचा घोर निश्चय केला, इप्सित पूर्ण करूनच जी थांबली आणि जिच्या पेरणीच्या बळावर उभा राहिलेला स्वातंत्र्यवृक्ष आज फुलापानांनी डवरला आहे नि पुढची पिढी त्याची फळंही चाखणार आहे, त्या मनस्विनीचं नाव होतं सॅरा हैल!

सॅराचा जन्म सतराशे अठ्ठ्याऐशी सालच्या चोवीस ऑक्टोबर रोजी अमेरिकेत हॅंपशायर परगण्यात झाला. अमेरिकेच्या स्वातंत्र्यप्राप्तीची घटना जुनी झाली होती. पण स्त्रियांची स्थिती 'जैसे थे' म्हणण्याजोगीच होती. मुलीस शिक्षण देणारे लोक समाजाच्या टीकेचं भक्ष्य ठरत होते. अशा वेळी स्त्रीनं करीयर करण्याचं स्वप्न कसं बघावं? स्त्री म्हणजे सोय संभाळणारी उपयुक्त वस्तू वा उपभोगाचं साधनच समजण्यात येत असे. व्यक्ती म्हणून तिचा स्वीकरच होत नसला तर समाजात तिला आदर न लाभणं वा प्रसंगी ती अस्थानी ठरणं स्वाभाविक होतं. अभ्यास करणाऱ्या भावाच्या कामाचं सॅराच्या मनात अपार कुतूहल! म्हणून तिच्या पित्यानं तिची शिकायची हौस पूर्ण करायचं ठरवलं. सॅरानं मिळालेल्या संधीचं सोनं केलं. पण मुलीला शिकवण्याच्या गुन्ह्याची (?) तिच्या वडलांना खूप सजा भोगावी लागली.

सॅराच्या मनात समाजातील स्त्री-पुरुष भेदभावाबद्दल तीव्र विरोध होता. समाजाचे रुढीचुस्त विचार फक्त स्त्रियांना काचत असणं, तिला पटत नसे नि रुचतही नसे. पित्यानं तिला शिक्षणाची संधी दिली. पण हेतुपूर्ण कामासाठी तिनं शिक्षण उपयोगात आणण्याचा मानस व्यक्त केला, तेव्हा त्यांनीही विरोध केला. यात त्यांना दोष देता येत नाही; कारण मुलीला शिक्षणाची संधी दिली, या गुन्ह्यासाठी (?) समाजानं त्यांना इतकं धारेवर धरलं की ते अगदी मेताकुटीस आले. म्हणून सॅरानं शिक्षण उपयोगात आणण्यासाठी काम करणं - पर्यायानं त्यांच्या त्रासात भर पडणं त्यांना नकोसं वाटलं. सहनशक्तीच्या पलिकडचंही! त्यांचा विरोध

स्वाभाविक ठरवला तरी सॅरासाठी विरोध करणाऱ्या समाजाची सुरूवात घरापासून झाली; हे नाकारता येत नाहीच! म्हणून तिच्या मनात नैराश्य दाटलं. तरी शिक्षित असून नशीबाला बोल लावत घरात निष्क्रिय बसून राहणं तिला पटेना की जमेना. मनाची घुसमट संपवण्याची तिला घाई झाली. त्यासाठी ती अथक प्रयत्न करत होती. म्हणून तिला शाळेत शिक्षिकेची नोकरी करण्याची संधी लाभली.

नोकरी मिळताच तिनं तृप्त होऊन स्वप्नांवर पूर्णविराम ठेवला नाही. तृप्त होणं तिच्या स्वभावातच नव्हतं. शिक्षणाच्या क्षेत्रात विविध प्रयोग व्हावेत - आपण ते करावेत, अशी तिला हौस! स्वतःची मर्यादा ओळखून तिनं धीम्या गतीनं प्रयोग सुरू केले. हळूहळू घडणारे बदल सुरूवातीस कुणाच्या लक्षात आले नाहीत. पण परंपरेपेक्षा बरंच वेगळं घडू लागल्याची जाणीव होताच तिला कडाडून विरोध झाला. विरोधाची प्रखरता वाढली. घरातूनही तिला पाठिंबा मिळत नव्हताच. समाजाच्या विरोधास तोंड देण्यात तिचे वडील कमी पडले. तरी ती नेटानं लढत राहिली.

तिची लढाऊ वृत्ती आणि स्वतःस योग्य वाटणाऱ्या विचारास चिकटून राहण्याचा निर्भय प्रयास, डेव्हिड हैल नावाच्या युवकास फार भावला. त्यानं तिच्याशी लग्न केलं. दांपत्यजीवनात चांगले सूर जुळले. समाज विरोध करत असला तरी घरातल्या ऊबदार वातावरणात त्या विरोधाचा दाह सह्य करण्याचं सामर्थ्य होतं. सॅरासारख्या आशावादी स्त्रीला प्रेरणा आणि उत्साह पुरवण्याचं सामर्थ्यही त्यात होतं. संघर्ष संपल्यानं आता निवांत मनानं तिची प्रगती होणं अपेक्षित होतं. पण अवघ्या नऊ वर्षात तिच्या दांपत्यजीवनाचा ग्रंथ आटोपला. या काळात सॅरा चार मुलांची आई झाली होती. पाचवं पोर तिच्या ओटीत असताना डेव्हिडचं अपघाती निधन झालं. चौथ्या दिवशी ती प्रसूत झाली. अचानक पाच मुलांच्या संगोपनाची पूर्ण जबाबदारी तिच्या एकटीच्या शिरावर कोसळली. डेव्हिडनं नुकतीच नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय सुरू केला होता. त्यात जम बसण्यापूर्वी त्याचं निधन झालं. म्हणून बचतीच्या बाबतीत आनंद होता. डेव्हिडच्या अपघाती मृत्युनंतर लगेच बाळाचा जन्म झाल्यानं, कॉम्पेन्सेशनची मागणी करणारा अर्ज करण्यास विलंब झाला. नियमाचे दिवस उलटल्यानंतर तिचा अर्ज पोहोचला. म्हणून ती मदतही मिळाली नाही. डेव्हिडचा मृत्यू ही केवळ दुःखदायक घटनाच नव्हे तर सॅरासाठी तीव्र समस्या निर्माण करणारी दुर्घटनाही ठरली.

या कसोटीच्या काळात सॅरानं पेनमध्ये शाई भरण्याचा निर्णय घेतला. जीवनातील अभाव आणि उणीवांनी निर्माण केलेला अंधार दूर करणारा तो समर्थ प्रकाशकिरण ठरला. १८२३ साली तिचा पहिला काव्यसंग्रह 'द जिनियस ऑफ ऑब्लियम' प्रकाशित झाला. जनतेनं तो उचलून धरला. पुढं १८२७ साली तिची पहिली कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीत तिनं समाजाला गुलामांच्या मनोवेदनेचं प्रत्ययकारी दर्शन घडवलं. तोवर माणुसकीच्या दृष्टीकोनातून समाजानं कधी गुलामांचे प्रश्न बघितले नव्हते. गंभीर विषयाचं सादरीकरण करताना सॅराची भाषा क्लिष्ट नव्हती. सहजसुंदर भाषेत गंभीर प्रश्नाचं निरुपण हे या कादंबरीचं वैशिष्ठ्य! रुढीचुस्त समाजास हादरा देण्याचं सामर्थ्य असलेल्या या कादंबरीनं समाजात अक्षरशः वैचारिक वादळ उठवलं. सॅराचा दृष्टिकोन इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनीतही सन्मानानं बघण्यात आला. तिथंही या कादंबरीचं प्रकाशन झालं आणि प्रचंड खपही! अत्यंत अल्प काळात या कादंबरीनं सॅराच्या लेखणीचा प्रभाव दूर सुदूर पोहोचवला. या कादंबरीनं सॅराला फक्त प्रकाशाच्या झोतात आणलं नाही तर तिच्या आर्थिक प्रश्नांसाठीही ती आशीर्वाद ठरली. रॉयल्टीचा चेक पाहून ती उद्‍गारली, "अंतःकरणाला भिडलं - बोचलं त्याला त्याच पद्धतीनं शब्दबद्ध करण्याचा हा प्रयास मला असा आर्थिक लाभ मिळवून देईल, अशी मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती."

सॅराच्या लेखणीची ताकत ओळखण्याची कुवत असलेल्या बॉस्टनच्या एका प्रकाशकानं त्याच्या आगामी प्रकाशनाचं संपादन करण्याची तिला विनंती केली. हे प्रकाशन स्त्रियांसाठी असणार होतं. आता स्त्रियांसाठी खूप नियतकालिकं प्रकाशित होत असली तरी त्याकाळी स्त्रियांसाठीच नियतकालिक सुरू करण्याचा विचार धाडसाचा ठरत होता. काही सामयिकात स्त्रियांसाठी मोजक्या पानांची व्यवस्था असणं सुरू झालं होतं. पण त्या पानांचं संपादन पुरुषच करत. पूर्ण नियतकालिकाची संपादनाची धुरा स्त्रीच्या शिरावर असणं आणि

केवळ स्त्रियांसाठी असलेल्या नियतकालिकाचं स्वतंत्र प्रकाशन सुरू करणं, हे दोन्ही विचार नवे आणि आव्हान ठरणारे होते. सॅरानं आत्मविश्वासानं ही आव्हानं स्वीकारली. आणि समर्थपणे पेललीही! सहज रीतीनं तिनं स्त्रीविश्वात स्वातंत्र्य आणि ज्ञानाची भूक निर्माण केली. स्त्री शक्तीच्या विकासाचं स्वप्न उरी बाळगुन ते सत्यात उतरवायला तिने अक्षरशः रक्ताचं पाणी केलं.

१८३७ साली इंग्लंडला राणी व्हिक्टोरीयाचा राज्याभिषेक होणार होता. त्या सुमारास सॅरानं पत्रकारितेच्या क्षेत्रात पदार्पण केलं. पहिल्या संपादकीय - अग्रलेखात तिनं लिहिलं, 'व्हिक्टोरीया शासन इतिहासात असा दूरगामी परिणाम सोडणार आहे की राणीविषयी खुद्द राणीला माहिती नसेल इतकी माहिती इतिहासात जमा होणार आहे.'

सॅराच्या चौकस आणि डोळस संपादनाइतकीच तिची वैयक्तिक कामगिरी नेत्रदीपक होती. बहुतेक नियतकालीकात त्या काळी कथा आणि लेख प्रसिद्ध होत. हे लिखाण अमेरिकन लेखकांचं असे. सॅरानं स्त्रियांना लिहितं केलं. त्यायोगे पुरुष लेखकांसाठी सशक्त स्पर्धेचं आव्हान निर्माण झालं. अमेरिकन लेखकांना या आव्हानाचा चांगला फायदा झाला. सॅराच्या आगळ्या कार्यप्रणालीमुळं, उदंड सकस लेखन प्रकाशित होऊ लागलं. प्रतिभावंत लेखक प्रकाशाच्या झोतात आले. विश्वविख्यात एडगर ऐलन पो, नाथलिगन, होर्थार्न, लाँगफेलो वगैरे लेखकांचा करीयरग्राफ, सॅराच्या आगळ्या संपादनाचं श्रेय आहे, असं म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

बॉस्टन आणि इतर ठिकाणीही स्त्री समाजात जागृतीचे पडघम वाजू लागले. तळागाळातल्या लोकाचं जीवन सुसह्य करण्यासाठीही सॅरानं जिवाचं रान केलं. खलाशांची दुर्दशा, त्यांची गलिच्छ घरं, अभावाच्या राज्यातील अनारोग्य, भूकबळी .... सारं पाहून तिचं संवेदनशील ह्रदय व्यथित होई. साऱ्या अनर्थाचं मूळ अज्ञानात आहे, असं तिला वाटे. म्हणून तिनं त्या समाजात ज्ञानपीपासा जागृत केली. त्यांच्यात मिसळून ती खास प्रशिक्षणवर्ग घेऊ लागली.

अथक परीश्रमाची कास धरून तिनं वासर गर्ल्स कॉलेज सुरू केलं. स्त्रीवर होणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या अन्यायास वाचा फोडण्याचं काम ती अग्रलेखातून निष्ठेनं आणि सातत्यानं करत असे. या कामाचे दुष्परिणाम भोगावे लागत असूनही! ती निर्भय होतीच; शिवाय नेत्रदीपक कर्तृत्वामुळं आर्थिक अडचण संपली असल्यानं, रुढीचुस्त समाजाच्या विरोधास ती कणखरपणे तोंड देऊ शकत असे.

स्त्री पुरुषांना विकासाची समान संधी मिळाली पाह्यजे, असं तिला मनापासून वाटे. त्या काळी परिचारिकेच्या क्षेत्रात फक्त पुरुषच असत. स्त्रीच्या स्वभावात सेवा करण्याची उपजत वृत्ती आणि जाण असते, हा विचार हिरीरीनं मांडून तिनं नर्सिंगच्या क्षेत्रात स्त्रियांना प्रवेश मिळवून दिला. नर्सिंगच्या क्षेत्रात स्त्रियांचा एकाधिकार असावा, यासाठीही तिनं अथक प्रयत्न केले. वैद्यकीय शिक्षण फक्त पुरूष घेऊ शकत, त्या काळात तिनं 'स्त्रियांचा यात समावेश झाला तर या लेडी डॉक्टर्सची स्त्रियांच्या समस्यातील गुंतागुंत उकलण्यास अमोल मदत होईल,' हा मुद्दा तिनं हिरीरीनं मांडला. त्यासाठी तिनं जनमत (पब्लीक पोल) घेतलं. पुरुषांच्या भयापोटी न बोलणाऱ्या स्त्रियांची मतं मिळवून तिनं जनमत तिच्या विचारांचं समर्थन करत असल्याचं सिद्ध केलं. परिणामी समाजातील प्रतिगामी विचारांच्या मुळावर प्रहार झाला. समाजात स्त्री डॉक्टर्स दिसू लागल्या.

अमेरिकतच नव्हे तर जगात प्रत्येक ठिकाणी स्त्रीसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडावेत असं तिला वाटे. म्हणून या महत्वाकांक्षेस शब्दरूप देणारे अग्रलेख लिहून तिचं समाधान झालं नाही. तिची डोळस नजर चौफेर भिरभिरत असे. हिंदुस्थान* आणि इतर अशियाई देशातील विषमता आणि बुरसटलेली समाजव्यवस्था तिनं चौकस नजरेनं टिपली. म्हणून स्त्रियांची मानसिक गळचेपी व त्यांच्या आरोग्यास अपरिहार्यपणे लागणारं नख, पाहून ती हेलावली. सुजाण लेडी डॉक्टर्स व नर्सेसचं एक खास मंडळ अशियाई देशात पाठवण्यात यावं, असं तिला वाटे. त्यासाठी तिनं जिवापाड प्रयत्न केले. तिचा प्रत्येक प्रयत्न, तिच्या भावी यशाची नांदी असे.

स्त्री स्वातंत्र्याचा विचार जाहिरपणे ओठी आणण्याचं धाडस करणारी सॅरा ही पहिली स्त्री! पत्रकारितेच्या माध्यमातून चळवळ सुरू करण्याची संकल्पना तिनं मनापासून राबवली. चार भिंतींच्या सीमित जगातून बाहेर पडून स्त्रीनं रचनात्मक कार्यात भाग घ्यावा, यासाठी ती स्त्रियांची प्रेरणामूर्ती बनली. स्त्रियांच्या पगाराच्या धोरणाबद्दलही तिनं आंदोलन केलं. पुरूषांइतकंच काम स्त्री करत असूनही स्त्री कामगारांना कमी वेतन मिळणं हा अन्याय आहे, हा मुद्दा तिनं कणखरपणे मांडला. धसासही लावला. अन्याय दिसेल त्या प्रत्येक ठिकाणी उडी घेण्याचा जसा तिनं वसा घेतला. स्त्रीविश्वाच्या प्रगतीसाठी तिनं जिवापाड प्रयत्न केले. पण अपवादानंही ती पुरुषद्वेष्टी असल्याचा कांगावा करण्याची संधी, तिच्या हितशत्रुंना तिनं मिळू दिली नाही. त्यासाठी ती सतत जागरूक राहिली. तिच्या करणीत अन्यायाचा विरोध होता. ती पुरुषद्वेष्टी नसल्यानं तिचा आवाज कधीही पुरूषविरोधी बनला नाही. नियतकालीकात लेखन पाठवणाऱ्या सुजाण लेखकांच्या अभिजात साहित्याचा ती आदरानं स्वीकार करत असे. म्हणून तिच्या कार्यात सुजाण बुद्धीप्रामण्यवादी (इंटिलेक्च्युअल्स) समाजाचा अशक्यप्राय सहकार तिला नेहमीच प्राप्त झाला.

'द लेडिज बुक ऑफ फिलाडेल्फिया' या तिच्या पुस्तकास अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. समीक्षकांनी निर्मळ, आदर्श, व्यावहारीक शहाणपण आणि सुरुचीचा अनुपम मैलाचा दगड - अशा शब्दात या पुस्तकाचा गौरव केला. विविध क्षेत्रातील तिचं योगदान आणि सत्कर्माविषयीची प्रामाणिक ओढ विचारात घेऊन, चार्ल्स डिकन्स या विख्यात लेखकानं तिला 'फिलाडेल्फियाचे आश्चर्य' (वंडर ऑफ फिलाडेलफिया) म्हणून नावाजलं.

पुस्तकं लिहिण्यापुरतं तिचं कार्य सीमित नव्हतं. ती केवळ लेखिका असती तर तिच्या नावावर जमा असणाऱ्या पुस्तकांच्या संख्येवर निदान एक शून्य तरी सहज पडलं असतं. तिच्याहून अधिक लेखन करणारे लेखक जगात खूप आहेत. अमेरिकेत हल्ली विचार देणारा विचारक वा तत्त्वचिंतक (फिलॉसॉफर) आणि ते अंमलात आणणारा कार्यकर (ॲक्टिव्हिस्ट) असं विभागून काम होताना दिसतं. या संदर्भात 'विचार करणारे आळशी असतात आणि काम करणारे निर्बुद्ध असतात' असा बोचरा विनोदही होतो. या पार्श्वभूमीवर सातत्यानं विचार करत ते अंमलात आणण्यासाठी कष्टाची कास धरणारी सॅरा, खरोखर वंडर ऑफ द वर्ल्ड (फक्त फिलाडेल्फिया नव्हे) वाटते. कार्यरत विचारक (ॲक्टिव्ह फिलॉसॉफर) परिचय ठरण्याजोगी! स्त्री स्वातंत्र्य आणि सन्मानासाठी स्वशक्ती राबवणाऱ्या सॅराचं, 'मेरी हॅड अ लिट्ल लॅंब' हे बालकाव्य जगभर लोकप्रिय झालं, हा सुखद दुर्मिळ योगच!

ती नव्वद वर्षांचं प्रदीर्घ आणि व्यस्त जीवन जगली. अत्यंत तृप्त मनानं कार्यरत जीवन कसं जगावं आणि अटळ मरणाचं कसं स्वागत करावं, या प्रश्नांचं सॅरा सुखद आणि उत्तम उदाहरण ठरली. सतत समाजाच्या विरोधास तोंड दिलं असूनही नामोहरम न होता तिनं नेहमी स्वस्थ मनानं विरोधावर मात केली. ज्यांनी तिच्या कार्यात अडथळे निर्माण केले, त्यांच्याविषयीही तिनं आकस बाळगला नाही, हे नवलच! त्यांच्या अज्ञानाविषयी सहानुभूती बाळगून तिनं त्यांच्यासाठी मत परिवर्तनाची संधी सदैव उपलब्ध ठेवली.

आज दिसणारी स्त्री विश्वाची प्रगती बऱ्याच अंशी सॅराच्या पराकाष्टेच्या प्रयत्नांचं फलित आहे. सशक्त विचार, कष्ट उपसण्याची तयारी आणि दीर्घायुष्याच्या विरल सहयोग यामुळे दहा जणींनी केलं असतं ते काम तिनं एकटीनं पार पाडलं. जणू ती व्यक्ती नव्हे तर उत्तम संस्थेचं जीवन जगली. जगानं आता नव्या सहस्त्रकाची कूस पालटली आहे. स्त्री विकासाचा वृक्ष डेरेदार झाला आहे. त्या कार्याची पाळंमुळं सहज नजरेस पडेनाशी झाली आहेत. तरी त्यांचं अस्तित्व नाकारणं शक्य नाही. म्हणून ह्या लेखाच्या रूपानं, नव्या सहस्त्रकाचं (मिलेनियम) स्वागत करणाऱ्या एकवीसाव्या शतकाच्या पहिल्या वर्षी, एका लेखिकेनं स्त्रियांच्या प्रगतीच्या उद्गात्रीस दिलेली ही मानवंदना आहे.

(पूर्व प्रसिद्धी रुची २००१ आणि प्रवासातील योगवियोग पुस्तकातील वेचलेले मोती या भागात)

फूट नोट

* तेव्हा देशाचं हिंदुस्थान नाव होतं. भारत हा सूचित - भविष्यातील गर्भस्थ देश होता.